अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती

# NOTICE

Displayed on- 01/08/2019 Notice No. 63

# फक्त वरिष्ठ विभागांकरिता

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना शिष्यवृत्ती (ई.बी.सी.) बाबत अत्यंत महत्वाची सूचना

शै.वर्ष २०१९–२० चे ऑनलाईन राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना शिष्यवृत्ती (ई.बी.सी) वरिष्ठ विभागाचे फॉर्म विद्यार्थ्यांना भरणेकरिता वेबसाईट चालू झालेली आहे. वेबसाईट खालीलप्रमाणे आहे.

**Website - mahadbt mahait.gov.in**

आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे.

१. शै.वर्ष २०१८–१९ मा.तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला.
२. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स.
३. १० वी, १२ वी व त्यापुढील मार्कशिट.
४. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.
५. आधारकार्ड झेरॉक्स.
६. आधारकार्ड बॅंकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक व सोबत पावती जोडणे.
७. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट आवश्यक.
८. डोमासाईल सर्टिफिकेट.
९. स्वत: चे राष्ट्रीयकृत बॅंकेत खाते असलेले बॅंकपासबुक. ( आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)
१०. रेशनकार्ड झेरॉक्स. (पुढील पान व कुटुंबाची नांवे असलेले पान

अपलोड करणे)

११. प्रवेश चलन झेरॉक्स.

१२. ऑनलाईन असलेले हमीपत्र.

१३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरतांना चालू तपशीलमध्ये फीज् पेड या कॉलममध्ये झिरो टाकणे अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेज फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास महाविद्यालयाची उर्वरीत फी भरावी लागेल.

फी सवलतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना शिष्यवृत्तीचा (ई.बी.सी) वरिष्ठ विभाग फॉर्म भरला नाही, तर संबंधित विद्यार्थ्यास महाविद्यालयाची उर्वरीत फी भरावी लागेल. विद्यार्थ्यांच्या होणा—या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील, याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेची नि:शुल्क सुविधा आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सायबर कॅफे मध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी विद्यार्थ्यांनी या सुविधेचा जास्तीत जास्त वापर करावा.**

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

D:\USERS\JADHAVNS\SCHOLARSHIP 2019-20\SCHOLARSHIP NOTICE 2019-20\SCHOLARSHIP NOTICE NEW 2018-19.DOCX

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on : 04/01/2020 Notice No. 279

## राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना

## सन २०१९–२०

## ( फक्त सिनीयर कॉलेज )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मागासवर्गीय घटकांतील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू असून अव्यवसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आहे. अटी,नियम,व पात्रता असलेले परिपत्रक क्र. ३/२०२० विद्यापीठ वेबसाईटवर टाकलेले आहे. तरी विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी दि. **२५/०१/२०२०** पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरावेत.

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

- **अटी, नियम व पात्रता पुढीलप्रमाणे –**
  १. सदरची योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाच लागू होणार आहे.
  २. सदरच्या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतीही अट राहणार नाही. केवळ गुणवत्ता हा निकष राहील.
  ३. विद्यार्थ्याने मागील परिक्षेत एप्रिल/मे २०१९ किमान ६०% गुण मिळविलेले असावेत.
  ४. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थ्यास संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच दिला जात असल्याने सन २०१७–१८ व २०१८–१९ मध्ये पदवी वर्ग व २०१८ –१९ मध्ये पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज भरु नयेत.
  ५. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.
  ६. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील
  ७. पात्र विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमासाठी रु १२०००/– व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु.१८०००/– असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

८. सर्व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याचा गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल. भारत सरकार शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र असतील तथापि, या शिष्यवृत्तीसहित दोन पेक्षा जास्त शिष्यवृत्ती घेण्यास सदर विद्यार्थी पात्र नसेल.

९. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

१० .विद्यार्थ्याने बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

११ .सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यास संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.

१२.पात्र विद्यार्थ्याचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २५ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता ३० पेक्षा जास्त नसावे.

१३. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणा—या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्याचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

१४. सदर शिष्यवृत्तीचा एकूण २००० मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लाभ मिळणार असून ५० टक्के विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार (मागास वर्ग विद्यार्थ्यांची एकत्रित गुणवत्ता) विचारात घेऊन व उर्वरित ५० टक्के गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवर्गासाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारनुसार शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाईन

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१. विद्यार्थ्याच्या मागील वर्षाची एप्रिल/मे २०१९ मार्कलिस्टची स्वंयसाक्षांकित झेरॉक्स प्रत.

२. आधारकार्डच्या झेरॉक्सची स्वंयसाक्षांकित प्रत.

३. जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

४. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

५. राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स

६. फॉर्मसोबत आधारकार्ड लिंकिग सिडींग स्लीप जोडणे आवश्यक आहे

| रजिस्ट्रार | प्राचार्य |
|---|---|
| तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, | तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, |
| बारामती. | बारामती. |

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Anekant Education Society's

**Tuljaram Chaturchand College, Baramati**

# Notice

Notice No. 312 Displayed on : 07/02/2020

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ( फक्त सिनीयर ई.बी.सी.खुला प्रवर्ग) व ज्युनियर व सिनीयर विभाग सर्व जातसंवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप/फ्रिशिप अंतिम मुदतवाढीबाबत अत्यंत महत्त्वाची सूचना

शै. वर्ष २०१९—२० मधील महाडीबीटी वेबसाईटवर ऑनलाईन सर्व जातसंवर्गातील स्कॉलरशिप व फ्रिशिप व राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ई.बी. सी.फक्त सिनीयर विभाग) फी सवलतीचे फॉर्म भरण्याची अंतिम मुदत दि. २९/०२/२०२० पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

तरी, ज्या विद्यार्थ्यांनी फी सवलतीत प्रवेश घेतलेला आहे, व अद्यापपर्यंत फॉर्म भरलेला नाही. अशा विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वेबसाईटवर ऑनलाईन फॉर्म भरावेत व हार्डकॉपीची ऑनलाईन प्रिंट सर्व कागदपत्रांसहित शिष्यवृत्ती विभागात जमा करावी. अन्यथा फॉर्म पुढे पाठविता येणार नाहीत व दिलेल्या मुदतीत फॉर्म न भरणा—या विद्यार्थ्यांना उर्वरीत फी भरावी लागेल. याची विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन कार्यवाही करावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's
**Tuljaram Chaturchand College, Baramati**

# Notice

**Displayed on : 04/01/2020** **Notice No. 278**

# क्रांती ज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती

# सन २०१९–२०

## ( फक्त सिनीयर कॉलेज विद्यार्थिनीसाठी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांमार्फत विद्यार्थिनीकरिता क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१९–२० साठी आपल्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तरमध्ये शिकणा–या विद्यार्थिनी अर्ज ऑनलाईन भरावयाचे आहेत. तरी सदर शिष्यृत्तीचा ज्या विद्यार्थिनींना लाभ घ्यावयाचा आहे. त्यांनी दि. २५/०१/२०२० पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरुन प्रिंट आवश्यक कागदपत्रांसहीत महाविद्यालयात सादर करावी. खालील वेबसाईटवर ऑनलाईन फॉर्म भरावेत.

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

**शिष्यवृत्तीचे नियम व अटी–**

१. विद्यार्थिनी एप्रिल/मे २०१९ मध्ये झालेल्या परिक्षेत पहिल्याच प्रयत्नांत ५०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेली असावी.

२. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थिनीस संपूर्ण पदवी काळात एकदाच दिला जात असल्याने शै. वर्ष २०१७–१८ व २०१९–२० मध्ये या शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थिनीने पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच पदव्युत्तर वर्गातील २०१८–१९ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थिनीने पुन्हा अर्ज करु नयेत.

३. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्याक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त १० व अव्यवसायिक पदव्युत्तर अभ्याक्रमातील जास्तीत जास्त ०५ विद्यार्थिनी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

४. विद्यार्थिनींच्या पालकांचे उत्पन्न सन २०१८–१९ मध्ये रु. २,५०,०००/– पेक्षा च्या जास्त नसावे.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

५. विद्यार्थिनींनी व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.

६. अर्थसहाय्यासाठी विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर उपक्रमातील सहभाग. उदा. क्रीडा, समाजसेवा, कला इ. विचारात घेण्यात येईल.

७. सदर शिष्यवृत्तीची रक्कम रु. ५०००/— इतकी आहे.

८. विद्यार्थिनीस गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेत गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थिनीस या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी अथवा शिष्यवृत्ती स्विकारता येणार नाही.

१० सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थिनीस संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच देण्यात येईल.

११.विद्यार्थिनीने व्यावसायिक अभ्याक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.

१२ विद्यार्थिनीने तिच्या बॅक खात्याची (राष्ट्रीयकृत) संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

१३. विद्यार्थिनींची नियीमत अभ्यासक्रमास किमान ७५% उपस्थिती असणे आवश्यक आहे.

१४. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यांत येणा—या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्याचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

**ऑनलाईन फॉर्म सोबत जोडावयाची कागदपत्रे —**

१. एप्रिल/मे २०१९ ची गुणपत्रिकेची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

२. शै.वर्ष २०१८—१९ चा मा. तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखल्याची झेरॉक्स प्रत.

३. रहिवाशी दाखला / आधारकार्डाची झेरॉक्स साक्षांकित झेरॉक्स प्रत.

४. बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत व प्रपत्र ब दोन प्रतीत.

५. बॅक खाते आधारकार्ड आधार लिंकिग केलेले असावे.

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Anekant Education Society's

Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 276 Displayed on : 2 JAN 2020

## जातसंवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप/फ्रिशिप अंतिम मुदतीबाबत अत्यंत महत्त्वाची सूचना

( ज्युनियर आणि सिनियर विभागातील विद्यार्थ्यांसाठी)

शै.वर्ष २०१९–२० महाडीबीटी वेबसाईटवर ऑनलाईन स्कॉलरशिप व फ्रिशिप जातसंवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप/फ्रिशिप यांचे फॉर्म भरण्याची अंतिम मुदत १५/०१/२०२० आहे.

तरी फी सवलतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वेबसाईटवर ऑनलाईन लवकरात लवकर फॉर्म भरावेत. विद्यार्थ्यांच्या होणा–या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Anekant Education Society's

## Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 313 Displayed on : 08/02/2020

**कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात संपूर्ण फी भरलेल्या कॅटेगरीतील व राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजनेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती फॉर्म भरणेसंदर्भात महत्वाची सूचना**

शैक्षणिक वर्ष २०१९–२० मधील एस.टी, एस.सी, एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी व राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क (एस.ई.बी.सी) या योजनेतील काही विद्यार्थ्यांनी १५/१२/२०१९ या शासनाने दिलेल्या मुदतीमध्ये शिष्यवृत्तीचे फॉर्म भरलेले नव्हते यामुळे अशा विद्यार्थ्यांनी उर्वरित प्रवेश फी भरलेली आहे. तरी, या संबधित सर्व विद्यार्थ्यांनी कळविण्यात येते कि, शिष्यवृत्तीचे फॉर्म भरण्याची मुदत दि. २९/०२/२०२० पर्यंत वाढविण्यात आली आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी मुदत वाढण्यापूर्वी महाविद्यालयाची संपूर्ण फी भरलेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत जर शिष्यवृत्ती फॉर्म भरले तर आपण भरलेली प्रवेश फी शासनाकडून शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर आपणांस परत करणेत येईल याची संबधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's
**Tuljaram Chaturchand College, Baramati**

# Notice

**Displayed on : 04/01/2020** **Notice No.** 280

# आर्थिक दुर्बल घटक अर्थसहाय्य शिष्यवृत्ती

## सन २०१९–२०

## ( फक्त सिनीयर कॉलेज )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांमार्फत विद्यार्थ्यांकरिता आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१९–२० साठी आपल्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तरमध्ये शिकणारे विद्यार्थी अर्ज ऑनलाईन भरु शकतात. तरी सदर शिष्युत्तीचा ज्या विद्यार्थ्यांना लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी दि. २५/०१/२०२० पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरुन प्रिंट आवश्यक कागदपत्रांसहीत महाविद्यालयात सादर करावी. खालील वेबसाईटवर ऑनलाईन फॉर्म भरावेत.

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

**शिष्यवृत्तीचे नियम व अटी–**

१. विद्यार्थ्यांच्या पालकांचे (कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित) शै. वर्ष २०१८–१९ वार्षिक उत्पन्न रु.२,५०,०००/– पेक्षा जास्त नसावे. मा. तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक आहे.

२. एप्रिल/मे २०१९ मध्ये झालेल्या परिक्षांत पहिल्याच प्रयत्नांत ६५% गुण संपादित केलेले असावेत.

३. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थ्यांस एकदाच दिला जात असल्याने सन २०१७–१८ व २०१८–१९ मध्ये पदवी व २०१८–१९ मध्ये पदव्युत्तर वर्गात शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करु नयेत. त्यांची शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

४. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्याक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त २० व अव्यवसायिक पदव्युत्तर अभ्याक्रमातील जास्तीत जास्त १० विद्यार्थी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

५. पात्र विद्यार्थ्यांस पदवी अभ्यासक्रमासाठी रु.३०००/— व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु.६०००/— असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

६. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमास किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे.

७. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी नसावी.

८. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा.त्यासाठी नागरिकत्वाचा साक्षांकित दाखला जोडणे आवश्यक आहे.

१०. विद्यार्थ्याने बॅंक खात्याची (राष्ट्रीयकृत) संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

११. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यांस संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच दिले जाईल.

१२. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणा—या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्याचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅंक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती देण्यात यावी.

**ऑनलाईन भरलेल्या प्रिंटसोबत जोडावयाची कागदपत्रे—**

१ विद्यार्थ्याच्या पालकाचा वार्षिक उत्पन्न दाखला सन २०१८—१९ मा. तहसिलदारांचा असावा.

२. मागील वर्षाची एप्रिल/मे २०१९मार्कलिस्टची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

३. नागरिकत्वाच्या दाखल्याची साक्षांकित प्रत. (डोमासाईल झेरॉक्स प्रत.)

४. आधारकार्डच्या झेरॉक्सची साक्षांकित प्रत.

५. राष्ट्रीयकृत बॅंकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत.

६. आधारकार्ड बॅंक खात्याशी लिंकिग केलेले असावे.

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

D:\USER PROFILE\srthombare\Desktop\DNYANESH\University Scholarship Notice 2018-19.docx

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

**Displayed on : 04/01/2020** **Notice No.** 277

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना सन २०१९–२०

## ( फक्त सिनीयर कॉलेज )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गुणवंत विद्यार्थ्यांनी प्रोत्साहन देण्यासाठी ही शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. अव्यवसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ही योजना आहे. अटी,नियम व पात्रता असलेले परिपत्रक क्र. ३/२०२० विद्यापीठ वेबसाईटवर टाकलेले आहे. तरी विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी दि. २५/०१/२०२० पर्यंत ऑनलाईन फॉर्म आवश्यक त्या कागद पत्रासहित भरावेत.

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

- **अटी, नियम व पात्रता पुढीलप्रमाणे –**

१. विद्यार्थ्यान मागील परिक्षेत एप्रिल/मे २०१९ किमान् ७० टक्के गुण संपादित केलेले असावेत.

२. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थ्यास संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच दिला जात असल्याने सन २०१७–१८ व २०१८–१९ मध्ये पदवी वर्ग व २०१८ –१९ मध्ये पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज भरु नयेत.

३. सर्व अव्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी नसावी.

४. पात्र विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमासाठी रु. १२०००/– व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु. १८०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल.

५. पात्र विद्यार्थ्याचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २३ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता २५ पेक्षा जास्त नसावे.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

६. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील.

७. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

८. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वचा साक्षांकित दाखला जोडणे आवश्यक आहे.

९. विद्यार्थ्याने बॅक खात्याची (राष्ट्रीयकृत) संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे

१०.पदव्युत्तर अभ्यासक्रमास जास्तीत जास्त ८०० आणि पदवी अभ्यासक्रमासाठी १२०० विद्यार्थ्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार आहेत.

**ऑनलाईन भरलेल्या प्रिंटसोबत जोडावयाची कागदपत्रे –**

१. विद्यार्थ्याच्या मागील वर्षाची एप्रिल/मे २०१९ मार्कलिस्टची स्वंयसाक्षांकित झेरॉक्स प्रत.

२. आधारकार्डच्या झेरॉक्सची स्वंयसाक्षांकित प्रत.

३. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

४. राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स

५. बॅके खाते आधारकार्डला लिंकिग करणे आवश्यक आहे.

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

D:\USER PROFILE\srthombare\Desktop\DNYANESH\University Scholarship Notice 2018-19.docx

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

**Displayed on :24/08/2019** **Notice No.** 100

## भारत सरकारची (सेंट्रल सेक्टर) महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०१९–२०२०

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च २०१९ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नविन मंजूरीचे आणि नुतनीकरणाचे अर्ज ऑनलाईन मागविण्यात येत आहे. नविन मंजुरीसाठी केंद्र शासनाकडून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**केंद्र शासनामार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत www.scholarship.gov.in या वेबसाईटवर करावेत.**

### किमान पात्रता व अटी :

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

३. अर्जदाराचे/त्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.

४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

५. या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना बॅंक खात्यामध्ये केंद्र शासनाच्या कडून परस्पर जमा करण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जवळच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेत खाते उघडून त्यासंदर्भातील सर्व माहिती भरने आवश्यक आहे.

६. खाते क्रमांक व इतर बॅंक तपशील भरण्यात विद्यार्थ्याकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बॅंक खातें क्रमांक संपूर्ण अंक टाकावेत व जॉईंट खाते नसावे. स्टेट बॅंक ऑफ इंडियाने विद्यार्थ्यांना शून्य रकमेवर बॅंक खाते उघडण्यासाठी खास सवलत दिलेली आहे.

७. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसुल केली जाईल.

- शिष्यवृत्ती नविन/ नूतनीकरण (Renewal) अर्ज करण्याची कार्यपध्द्ती.

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार नवीन मंजुरीसाठी व नूतनीकरणासाठी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्द्तीने ३१/१०/२०१९ पर्यंत अर्ज करने आवश्यक आहे.

२. शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ५०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

३. नविन अर्ज भरताना इ. १२ वीची गुणपत्रिका व राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका–याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडने आवश्यक आहे.

४. नविन मंजुरीसाठी **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर मेरीट लिस्ट प्रसिध्द् करण्यात आली असून अशाच विद्यार्थ्यांनी नविन शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत.

५. नुतनीकरणाच्या अर्जासोबत मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत व राष्ट्रीयकृत बॅंक खाते पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सोबत जोडावी.

६. विद्यार्थ्याच्या अर्जासोबत आधार कार्ड असणे आवश्यक आहे. तसेच त्याचा आधारक्रमांक हा त्याच्या बॅंक खात्याशी संलग्न असणे आवश्यक आहे.

७. अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन अर्जाची प्रत (हार्ड कॉपी)आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

८. अर्ज भरताना विद्यार्थ्यांना काही अडचन/शंका असतील तर महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागाच्या मदतीने आपल्या अडचणी दूर करुन घ्याव्यात.

## नवीन/नूतनीकरनाच्या अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :

१. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो).

२. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१९ गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.

३. राष्ट्रीयकृत बँक पासबुकच्या पहिल्या पानाची ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांकाची नोंद आहे त्याची प्रत.

४. आधारकार्डाची प्रत व आधार कार्ड सिडींग स्लीप.

५. प्रवेश चलनाची झेरॉक्स.

६. बोनाफाईड.

७. पालकांचा मा. तहसिलदारांचा सन २०१८–१९ चा उत्पन्नाचा दाखला.

**नवीन व नूतनीकरण ऑनलाईन मंजूरीचे अर्ज** दि. ३१/१०/२०१९ पर्यंत परिपूर्ण रित्या आवश्यक त्या कागदपत्रांसह महाविद्यालयात स्कॉलरशिप विभागात सादर करणे आवश्यक आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on : 21/08/2019 Notice No. : 93

## अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन २०१९–२०

## Web site – www.scholarships.gov.in

केंद्र शासनाकडून **मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौध्द, जैन व पारशी** अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१९–२० साठी **ऑनलाईन** भरण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. शै. वर्ष २०१७–१८ पासून केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता ४८३०२ संच निर्धारीत केलेले असून त्यातील ३०% संच मुलींसाठी राखीव आहेत. **ऑनलाईन फॉर्म भरण्याची अंतिम मुदत दि. ३१/१०/२०१९ आहे.**

*** शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :**

११ वी ते पी.एच.डी, व्यावसायिक (डी.एड.,बी.एड्.,एम. एड्.,आय.टी.आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम.सी.व्ही.सी.अभ्यासक्रम. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

*** किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. मागील परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३. **अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.**
४. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २ लाख इतकी आहे.
६. एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI

७. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल /वसूल केली जाईल.
८. विद्यार्थ्याने राष्ट्रीयकृत बॅकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे.

* **अर्ज करण्याची पध्दत (नविन मंजुरी/नूतनीकरण)**

१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी नवीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या बॅक खात्याच्या पासबुकावर असलेल्या पूर्ण नावानुसारच संपूर्ण नाव टाकून नोंदणी करावी. आवश्यक माहिती भरल्यानंतर विद्यार्थ्याचा टेंपररी ॲप्लीकेशन आयडी प्राप्त होईल. हा आयडी विद्यार्थ्यांस वापरुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावा. सदर आयडी विद्यार्थ्यास अर्ज करण्यासाठी व अर्जाची सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी होणार आहे.

३) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या होमपेज वरील Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४) ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावी. विद्यार्थ्यांनी त्यांच्या माहितींसाठी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांची प्रिंट काढून ठेवावी.

५) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचा मागील वर्षीच्या अर्जात भरलेला बॅक खाते क्रमांक वापरुन नूतनीकरणाचा अर्ज www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर भरावा व अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावी. नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यास ५०% पेक्षा कमी मार्कस् नसावेत.

६) नवीन व नूतनीकरणाचा अर्ज भरणा—या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे (उदा. विद्यार्थ्याचा फोटो, चालु वर्षाची फी भरल्याची पावती, मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत, पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र, आधारकार्ड असल्यास इ.) स्कॅन करुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे. त्यातील माहिती भरुन नंतर ती कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.(उदा. विद्यार्थ्याचे अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषित घोषणापत्र, बोनाफाईड सर्टिफिकेट इ.)

७) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये

येणे अनिवार्य आहे.

* **विद्यार्थ्यांनी फॉर्मसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

१. अर्जावर विद्यार्थ्याचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरीसह असावा.

२. मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत.

३. कायमचा निवासाच्या पत्त्यासंबंधी पुरावा म्हणून शिधापत्रिका, वीज / दुरध्वनी देयक, पारपत्र, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड यापैकी कोणत्याही एका पुराव्याची छायांकीत व साक्षांकीत प्रत जोडावी.

४. विद्यार्थ्याचे अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषित घोषणापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

५. मा. तहसिलदार यांचा सन २०१८–१९ चा उत्पन्नाचा दाखला.

६. बॅक पासबुकाच्या पहिल्या पानाची – ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड नंबरची नोंद आहे, त्याची छायांकीत प्रत जोडावी. सदर बॅक खाते चालू स्थितीत असावे.

७. आधार कार्डाची छायांकित प्रत जोडावी.

८. प्रवेश फी भरलेल्या चलनाची झेरॉक्स.

९. बोनाफाईड सर्टिफिकेट.

**तरी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसहित प्रशासन भवन स्कॉलरशिप विभागामध्ये जमा करावेत. याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती

# NOTICE

Displayed on- 21/08/2019 22 AUG 2019 Notice No. 91

## जातप्रवर्गातील (कॅटेगरी) विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप बाबत अत्यंत महत्वाची सूचना

शै.वर्ष २०१९–२० एस.सी., एस.टी, एन.टी., ओ.बी.सी., व एस.बी.सी या जातप्रवर्गातील विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टल स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेकरिता सुरु झालेले आहे. वेबसाईट खालीलप्रमाणे आहे.

**www.mahadbtmahait.gov.in**

ऑनलाईन फॉर्म भरणेकरीता आवश्यक कागदपत्रे –

१. विद्यार्थ्याचा स्वत: च्या नावाचा जातीचा दाखला.
२. सन २०१८–१९ तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला.
३. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स.
४. आधारकार्ड झेरॉक्स.
५. आधारकार्ड बॅंकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक व सोबत पावती जोडणे.
६. गतवर्षीचे मार्कशिट.
७. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट आवश्यक.
८. डोमासाईल सर्टिफिकेट.
९. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.
१०. स्वत: चे राष्ट्रीयकृत बॅंकेत खाते असलेले बॅंकपासबुक. (आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)
११. रेशनकार्ड झेरॉक्स. (पहिले पान व कुटंबाचे नाव असलेले पान)
१२. प्रवेश चलन झेरॉक्स.

१३. ऑनलाईनवरील प्रतिज्ञापत्र.

विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे.

**Senior College - Tuljaram Chaturchand College(0)**

**Junior College - Tuljaram Chaturchand College (27250211827)**

**Vocational (Jr. College) - ANEKANT EDUCATION SOCIETY'S TULJARAM CHATURCHAND COLLEGE (2765211090)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी ताबडतोब फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे प्रशासन भवन स्कॉलरशिप विभागात जमा करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश फी सवलतीत झालेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही, तर संबंधित विद्यार्थ्यांच्या होणा—या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील, याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेची नि:शुल्क सुविधा आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सायबर कॅफे मध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी विद्यार्थ्यांनी या सुविधेचा वापर करावा.**

रजिस्ट्रार
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
बारामती

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on : 22/08/2019 Notice No. : 94

## केंद्र शासनाची अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना शै.वर्ष २०१९–२०

केंद्र शासन अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविते. तरी, शै. वर्ष २०१९–२० साठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी, विद्यार्थ्यांनी दिलेल्या नियम व अटींच्या आधीन राहून खालील वेबपोर्टलवर दि. ३१/१०/२०१९ पर्यंत अर्ज करावेत.

**www. scholarships.gov.in**

नियम व अटी –

१. अर्जदार हा भारताचा रहिवासी असावा.
२. अर्जदाराची अपंगत्व टक्केवारी ४० टक्के व त्यापुढील असावी.
३. अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
**४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.**
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख इतकी असावी.
६. एका कुटूंबातील फक्त २ अपंग अपत्यांनांच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे**

१. विद्यार्थ्याचा फोटो.
२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.
३. पालकांचे मा. तहसिलदार सन २०१८–१९ चे वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र.
४. महाविद्यालयास चालू वर्षाची फी भरल्याची पावती /रिसीट.
५. स्वतःच्या राष्ट्रीयकृत बॅक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.

६. विद्यार्थ्याचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र राज्य शासनाच्या सक्षम वैद्याकिय अधिका—याने प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.

७. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.

८. आधारकार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधारकार्ड नसेल तर त्या विद्यार्थ्याने नोंदणी आयडी स्लीप किंवा बॅक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅनकार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत इ. यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

९. आधार क्रमांक बॅक खात्याशी लिंक केलेला असणे आवश्यक आहे.

**तरी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक तया कागदपत्रांसहित प्रशासन भवन स्कॉलरशिप विभागामध्ये जमा करावेत. म्हणजे महाविद्यालयास ऑनलाईन पुढील कार्यवाहीकरिता पाठविता येतील. याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

d:\users\jadhavns\scholarship 2019-20\scholarship notice 2019-20\handicapped scholarship 2019-20.docx